जॉनीने सफरचंदाच्या बिया पेरल्या



जॉनीने सफरचंदाच्या बिया पेरल्या



मराठी : अश्विनी बर्वे

जॉन चैपमैन अमेरिकेचा असा एक लोकनायक आहे की जो खरा तर एक सामान्य व्यक्ती होता. दोनशे वर्षापूर्वी त्याने आपल्या देशात काही ठिकाणी सफरचंदाची झाडे लावली.ज्यामुळे लोक त्याला **जॉनी एप्पलसीड** च्या नावाने ओळखू लागले होते.

त्याची कहाणी अतिशय अनोखी आणि रोचक आहे. पण काळाबरोबर त्यात अनेक गोष्टी वाढवून सांगितल्या गेल्या. काही गोष्टी तर कधी घडल्याही नव्हत्या. पण हे तर सत्य आहे की जॉनी लोकांबरोबर प्राण्यांवरही प्रेम करत होता. अमेरिकेतील गर्दी आणि जंगलसुद्धा त्याला फार प्रिय होते.

जॉनी एप्पलसीडचे खरे नाव जॉन चैपमैन होते. तो जिथे जाईल तिथे सफरचंदाचे बी लावत असे.म्हणून त्याचे नाव **जॉनी एप्पलसीड** पड़ले होते.



जॉनीचा जन्म 26 सप्टेंबर 1774 रोजी मेसाचुसेट्स मध्ये झाला होता. त्याचे वडील शेतकरी होते. वडिलांबरोबर शेतात काम करायला त्याला आवडत असे.



पण जॉनीला सफरचंदाच्या झाडांची काळजी घ्यायला त्याला सगळ्यात जास्त आवडत होते. सफरचंदाच्या झाडावर चढून पिकलेले लाल-लाल सफरचंद तोडण्यात त्याला फार आनंद वाटायचा.




जेव्हा जॉनी तरुण होता. त्यावेळी काही लोक पश्चिमेकडे ओहियो मध्ये आणि इतर दूर जागांवर जावून राहू लागले होते. जे लोक सगळ्यात आधी तिथे गेले होते त्यांना आपले घर बांधण्यासाठी आणि शेती करण्यासाठी जंगल कापावे लागत होते. त्यामुळे सफरचंदाची झाडं लावण्यासाठी वेळच नव्हता.




जॉनीला जेव्हा समजले की पश्चिमेत राहणाऱ्या लोकांकडे सफरचंदाची झाडे नव्हती तेव्हा त्याला फार वाईट वाटले होते. त्याची अशी इच्छा होती की त्या लोकांना सुद्धा वसंत ऋतू मध्ये सफरचंदाच्या गुलाबी कळ्या बघायला मिळाव्यात. त्याला माहित होते की मोठी, पिकलेली सफरचंदे खाण्यात त्या लोकांना मजा येईल. आणि थंडीत गरम गरम सफरचंदाचे पाय खाणे त्यांना आवडेल.

“या लोकांना मदत करण्याचा मार्ग मला सापडायला हवा,” जॉनीने स्वतःशीच म्हटले.







ओहीयोत जाणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला जॉनी सफरचंदाचे एक झाड देवू इच्छित होता. पण त्या लोकांच्या गाड्या आधीच जरुरी सामानाने भरलेल्या असत.कोणाच्याच गाडीत झाड ठेवण्याइतकी जागा नव्हती.

तेव्हा जॉनीच्या मनात त्या लोकांना सफरचंदा च्या बिया देण्याचा विचार आला. तो जेव्हा सफरचंद खात असी तेव्हा तो त्यातली बी सांभाळून ठेवे. त्या बिया तो कातडी पिशवीत जमा करून ठेवत असे. जे लोक त्याच्या घरावरून जात असत त्यांना तो त्या बिया देई.




“बी मातीत लावून त्याला काट्यांचे कुंपण करा,” जॉनी म्हणे, “हरिण छोटी रोपे खाऊन टाकतात, झाडाजवळ गवत वाढणार नाही याची काळजी घ्या.”

बियांसाठी सगळेजण त्याचे आभार मानत होते. पण बिया रुजवण्याचा आणि सफरचंदाच्या झाडाची काळजी घेण्यासाठी लागणारा वेळ कोणाकडेच नव्हता.



एक दिवस जॉनीच्या मनात एक चांगला विचार आला. “मी ओहियोला जात आहे,” त्याने आपल्या आईवडिलांना सांगितले. “तिथे राहयला गेलेल्या लोकांसाठी मी सफरचंदाची झाडे लावणार.”

“पण तिथे तू एकटा पडशील,” त्याचे वडील म्हणाले. “तुला तुझ्या परिवाराची आणि मित्रांची कमी जाणवेल.”



“आणि त्या विराण भागात तू एकटा जावू शकत नाही,”आई म्हणाली. “तिथे किती जंगली जनावरं असतील, आणि जर तू बर्फाच्या वादळात अडकला तर? तू तिथे कुठे झोपणार?”

“मी मोकळ्या आकाशाखाली झोपेन,” जॉनी म्हणाला. “आकाश हे सगळ्यात चांगले छप्पर आहे, जे कोणालाही मिळू शकते.”





जॉनीच्या आई वडिलांना आता काळजी वाटू लागली.कारण त्यांना माहित होते की, जॉनीने जाण्याचा निश्चय केला होता. त्यांनी त्याला सामान गोळा करण्यास मदत केली. आईने त्याच्यासाठी स्वेटर विणले. स्वयंपाकासाठी सगळ्यात चांगले भांडे दिले, ज्यात तो अन्न शिजवू शकेल.




जाण्याआधी जॉनी सफरचंदाचा ज्यूस बनवणाऱ्या कंपनीत गेला. तिथे ज्यूस करण्यासाठी खूप साऱ्या सफरचंदाचा उपयोग केला जात होता. जॉनीने त्यांच्याकडे सफरचंदाच्या बिया मागितल्या.

“जितक्या बिया हव्या तेवढ्या घेवून जा,” कंपनीचा मालक म्हणाला.




जॉनीने इतक्या बिया घेतल्या की तो आपले सर्व सामान त्या बँगेत तो ठेवू शकला नाही.त्याने आईने दिलेली कढई डोक्यावर ठेवली.

“ही तर मस्त टोपी झाली,” तो म्हणाला.



प्रवास कठीण होता.सफरचंदाच्या बिया घेवून जॉनीला शेकडो मैल पायी चालावे लागले.

रस्त्यात थांबून तो एखाद्या शेतकऱ्याला मदत करत असे.त्याला लाकडं फोडून देत असे. किंवा झाडाला कुंपण करून देत असे. ज्यांना तो मदत करत असे ते त्याला जेवायला त्यांच्या घरी बोलावत असत. त्याला जेवू घालत. अशा प्रकारे त्याचे लवकरच खूप सारे मित्र झाले.



जॉनीला चांदण्यात झोपायला आवडत होते. त्याच्या आईला जंगली जानवरांच्या बाबत चिंता करण्याची गरज नव्हती. सगळे प्राणी त्याच्यावर प्रेम करत होते. एकदा बर्फाच्या भयंकर वादळात एक अस्वल जॉनीला चिटकून झोपले होते.



शेवटी जेव्हा जॉनी ओहियोला पोहचला तेव्हा त्याने नदीच्या किनाऱ्यावर बी लावले. बियांना सुरक्षित ठेवण्यासाठी त्याने त्याच्या बाजूला काटे लावले व कुंपण केले.

मग जॉनी दुसरीकडे गेला आणि तिथेही त्याने बिया पेरल्या. पण तो परत येवून बियामधून निघालेल्या छोट्या रोपांची देखभालही करत असे.



जेव्हा छोटी रोपे मोठे झाले तेव्हा त्याने त्यांना जमिनीतून बाहेर काढले. ती रोपे त्याने तिथे राहणाऱ्या लोकांना नेवून दिली. त्यामुळे ते सफरचंदाचे झाड लावू शकतील.





”काही वर्षातच तुम्ही या झाडाची फळे खाऊ शकाल,” जॉनी म्हणाला. “आणि वसंत ऋतूमध्ये सफरचंदाच्या गुलाबी कळ्या पाहू शकाल. इतके सुंदर दृश्य कुठेही पाहयला मिळणार नाही.”

ओहियो मध्ये राहणाऱ्या लोकांच्या घराजवळ जॉनीने हजारो झाडे लावली. थोड्यात काळात लोक त्याला जॉनी एप्पलसीडच्या नावाने ओळखू लागले.

तो अनेक प्रकारे लोकांना मदत करत असे.तो पडलेली झाडे हलविण्यास मदत करत असे.धान्य पेरत असे. घरासाठी फर्निचर करत असे.



लोक त्याच्या येण्याची उत्सुकतेने वाट बघत असत.

“चला मुलांनो, हात-तोंड धुवून जेवायला चला,” आया आपल्या मुलांना म्हणत. “जॉनी एप्पल सीड आज रात्री आपल्या घरी जेवायला येणार आहे.”



जॉनी एप्पलसीड ने आपले सर्व जीवन लोकांना मदत करण्यात व्यतीत केले. त्याच्या जीवनकाळातच ओहियो राज्यात सगळीकडे सफरचंदाच्या कळ्यांचा सुंगध पसरू लागला होता. आजही लोक जेव्हा सफरचंदाच्या बागा बघतात तेव्हा त्यांना जॉनी एप्पलसीडची आठवण येते.



समाप्त